# तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय अलिबाग

अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड

पिन ४०२२०१

Email-thoalibag@gmail.com


## राष्ट्रीय आरोग्य अभियान,अलिबाग रायगड मोबाईल मेडीकल युनिटसाठी निव्वळ रोजंदारी पदभरती जाहीरात

दिनांक-3/०४/२०२५

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अलिबाग येथील मोबाईल मेडीकल युनिटसाठी निव्वळ रोजंदारी पध्दतीने २०२४-२०२५ या वर्षासाठी दिनांक २९/०६/२०२५ रोजी पर्यंतच्या कालावधीसाठी खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.त्यानुसार रिक्त पदाचा तपशिल खालील प्रमाणे -

| अक्र | पदाचे नाव | पदाची आवश्यक शैक्षणिक अहर्ता | संबधित पदाचे नियुक्तीचे ठिकाण | पद संख्या | आरक्षण | दरमहा मानधन | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Medical Officer | M.B.B.S/B.A.M.S महाराष्ट्र कौन्सिल नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य | अलिबाग येथील मोबाईल मडीकल युनिट | १ | लागु नाही | M.B.B.S साठी रु ६००००/प्रति माह रोजंदारी तत्वावर<br>B.A.M.S ४००००/प्रति माह रोजंदारी तत्वावर | - |
| २ | Lab Technicin | B.Sc/12 th + DMLT + महाराष्ट्र कौन्सिल नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य | | १ | लागु नाही | रु १८०००/प्रति माह रोजंदारी तत्वावर | - |

### अटि व शर्ती

१.जाहीरातीतील पदे मोबाईल मेडीकल युनिट अलिबाग साठी निव्वळ रोजंदारी स्वरुपातील पदे असून सदर पदावर कायम पणाचा हक्क राहणार नाही व या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही.तसेच अर्जदाराला शासकिय सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्या संबधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

२.अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा व उमेदवाराची निवड झाले नंतर नियुक्ती आदेश प्राप्त झाले नंतर उमेदवाराने राजपत्रित अधिकारी यांचा वर्तणुकीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.

३.उपरोक्त निव्वळ रोजंदारी पदांकरीता रोजंदारी प्रमाणे मानधन देण्यात येईल. राज्यस्तरावरुन प्राप्त कृती आराखडा व मार्गदर्शक सुचनानुसार वर नमुद मानधनामध्ये बदल होवु शकतात.

४.अनुभवी व उच्च शैक्षणिक अहर्ता धारकास प्राधान्य दिले जाईल.

५.जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होवु शकतो व रिक्त ठिकाणाध्ये बदल होवु शकतो.तसेच उपरोक्त नमुद कोणत्याही पदाला जातनिहाय आरक्षण लागु नाही याची नोंद घ्यावी.

६.केंद्र शासनाने संबधित पदे नामंजुर केल्यास त्यांच्या सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येतील.

७.सदर पदभरती प्रक्रीयेसाठी इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायाकीत सत्य प्रतिसह आपले अर्ज दि. ४/०४/२०२५ ते दि. ११/०४/२०२५(कार्यालयीनदिवशी) या कालावधीमध्ये सकाळी १०.०० ते ५.०० या वेळेमध्ये तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय अलिबाग ता.अलिबाग जि-रायगड या कार्यालयामध्ये जमा करावे. दिनांक ११/०४/२०२५ रोजी ५.०० नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.तसेच इमेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही ,याची सर्व उमेदवारानी नोंद घ्यावी. याशिवाय पुर्णपणे भरलेला सोबत जोडलेल्या नमुन्यातील अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रे व नमुन्यामध्ये जोडलेल्या कागदपत्रांची यादी चेकलीस्ट अशा परीपुर्ण कागदपत्रासह उमेदवराने अर्ज करणे बंधनकारक राहील.

अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

गुणांकन पध्दती :-वरील सर्व पदांकरिता गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालील प्रमाणे राबविण्यात येणार आहे.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportionकाढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे proportion६०*५०/१००=३०) | ५० गुण |
| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा. १. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्णकरून अतिरिक्त B.Sc (Nursing)हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे proportion = ६०*२० /१०० = १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |

८.भरती प्रक्रीया रदद करणे स्थगित करणे,पदभरती प्रक्रीयेमध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परीषद अलिबाग यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही व न्यायालयात जाता येणार नाही.

९.वयोमर्यादा १८ वर्षे वय पुर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करु शकतात राष्ट्रीय अभियान अंतर्गत सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुला प्रवर्ग ३८ वर्ष ,राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील .राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरीता कमाल सेवा प्रवेश ५ वर्षापर्यंत शिथील राहील.

१०.भरती प्रक्रीयेदरम्यान उमेदवाराने चुकीची माहीती सादर केल्याचे ,कोणतीही माहीती दडवुन ठेवल्याचे दबाव तंत्राचा वापर किंवा अन्य अनुचित मार्गाचा केल्याचे आढळुन आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रदद करण्यात येईल व त्यास राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत भविष्यातील पदभरतीकरीता अपात्र ठरविणेत येईल.

११.उमेदवारांनी जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्येच अर्ज सादर करावेत.खाली नमुद आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

√ विहीत नमुन्यातील अर्ज.

√ शैक्षणिक अर्हता बाबतची सर्व प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (१० वी,१२ वी,पदवी ,पदव्युत्तर या शैक्षणिक अर्हतेच्या सर्व वर्ग व सर्व सत्राच्या गुणपत्रिका)

√ शाळा सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला.

√ NHM शासकीय संस्था,विभाग,शासन अंगिकृत संस्थेतील अनुभवाचा दाखला तसेच **covid** अंतर्गत शासकीय आरोग्य संस्थेतील अनुभवाचा दाखला असल्यास प्राधान्य दिले जाईल.

√ सबंधित पदाकरीता तत्सम कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र ,नोंदणीचे नुतणीकरण व कौन्सिलचे आयकार्ड

√ पासपोर्ट आकाराचे २ फोटो

√ उमेदवाराच्या नावात बदल झाला असल्यास शासनाचे राजपत्र.

√ आधारकार्ड

√ पॅनकार्ड

√ लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

१२. यशिवाय नियुक्ती प्रमाणपत्रा स्वीकारताना उमेदवारंनी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इंतर कागदपत्रांच्या मुळप्रती सादर करणे बंधनकारक राहील-मुळप्रती सादर न केल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल, तसेच उमेदवाराने नियुक्तीच्या वेळेस विहित नमुन्यातील करारनामा व राजप्रत्रिक अधिका-यांचे चांगल्या चारित्र्याचा दाखला सादर करणे बंधनकारक राहिल याची नोंद घ्यावी.

१३. उमेदवाराच्या पुर्वीच्या कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकिय वा वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही,किंवा फौजदारी अथवा कुठल्याही प्रकारची गंभीर गुन्हयाची नोंद झालेली नसावी.

१४. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अर्ज करणा-या उमेदवाराने यापुर्वी राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये काम केले असल्यास व त्याची अकार्यक्षमता/अनियमिततेच्या कारणामुळे सेवा समाप्त करणेत आली असल्यास सदर रोजंदारी पदभरती करीता अशा उमेदवारांचा विचार केला जाणार नाही-

१५.मुददा क्र १३व १४ मध्ये नमुद बाबी नियुक्ती नंतर कोणत्याही टप्प्यावर आढळुन आल्यास त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पूर्वसुचना न देता रदद करण्यात येईल व त्यास राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पदभरतीकरीता भविष्यातील पदभरतीकरीता अपात्र ठरविणेत येईल.

१६. सेवानिवृती शासकिय अधिकारी/कर्मचारी यांना मुळ वेतन (Basic Pay) + ग्रेड पे या दोन्ही रक्कमेची बेरीज वजा निवृती वेतन यामधिल फरकाची रक्कम मानधन म्हनुन अनुज्ञेय राहिल.

१७) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सेवानिवृती (कंत्राटी) अधिकारी/कर्मचारी मानधन निश्चित करताना फरकाची रक्कम व प्रकल्प अंमलबजावणी आराखढयातील पदकनहाय मुजुर मानधनाची रक्कम किंवा पदाचे सदयस्थितीतील अनुज्ञेय मानधन यापैकी जी रक्कम कमी असेल ती देय राहिल.

दिनांक :- /०४/२०२५

(डॉ.अश्विनी सपकाळ)
तालुका आरोग्य अधिकारी
ता.अलिबाग,जि-रायगड